# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.07.2025** **वारःगुरुवार**

1. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा राज्य सरकारचा निर्णय
2. अनुकंपा तत्त्वावरील भरतीबाबत लवकरच धोरण ठरवण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
3. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करायला सरकार केव्हाही तयार-उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं स्पष्टीकरण
4. इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी भारताची आश्वासक सुरुवात आणि
5. राज्यातल्या अनेक भागांमध्ये जोरदार पावसाचा इशारा

**विधानपरिषद**

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून यासंदर्भातलं विधेयक या अधिवेशनात आणून त्यानुसार कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत केली. ते म्हणाले....

**एनडीपीएस च्या अंतर्गत या लोकांवर कारवाई करतो ते बेल घेतात, आणि पुन्हा कारवाई करतात आणि म्हणून यांच्यावर मकोका लावता येईल का तर आपण तो निर्णय घेतलेला आहे. आपल्या कायद्यामध्ये बदल करून आपण यांना संघटित गुन्हेगारी खाली मकोकाखाली अटक करता येईल. या प्रकारचं अमेंडमेंट याच अधिवेशनात आणतो आहोत. हा टास्क फोर्स पूर्णपणे कार्यान्वित झालेला आहे पण आता प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्रपणे एनडीपीएसचं युनिट आपण तयार केलेलं आहे. त्याला अधिकारी आणि अंमलदार हे दिलेले आहेत आणि त्याची कारवाई आपण सुरू केलेली आहे.**

विविध विभागांतल्या अनुकंपा तत्त्वावरील भरतीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**पोलिसांचे सगळ्या विभागांना सांगितलेलं आहे की अनुकंपाची जी काही नियुक्ती आहे ही मिशन मोडवर द्यायची त्यामुळे सगळ्याच विभागांमध्ये आता हे काम आपण चालू करतो. आपण सांगितलं तसं विभागाने काही अडचणी सांगितल्या होत्या त्या अडचणी दूर करून त्याची नियमावली आपण लगेच प्रसिद्ध करतोय आणि मोठ्या प्रमाणात म्हणजे आता हे मिशन मोडवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. अनुकंपा भरती खूप मोठ्या प्रमाणात आपण करणार आहोत.**

राज्यातल्या विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्यानं अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचं अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून लवकरच याबाबतचा निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्याबाबत सुमारे तीस हजार हरकती आणि सूचना दाखल झाल्या असून, त्यावर नगर नियोजन विभागाकडून सविस्तर सुनावणी करण्यात येत आहे. सुनावणीनंतर आवश्यक सुधारणा करुन अंतिम आराखडा तयार केला जाईल असं राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधान परिषदेत सांगितलं. या विकास

आराखड्यामध्ये कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. विद्यार्थी संख्या कमी झाली तरी राज्यात कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत एका लक्षवेधीला उत्तर देताना सांगितलं. शासनानं कुठलीही शाळा बंद केली नसल्याचं स्पष्टीकरण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिलं.

**विधानसभा**

राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचंच आहे, शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करायला सरकार तयार आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सांगितलं. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं ही सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलच अशी ग्वाही त्यांनी दिली. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचं हित साधणं, त्यांचे प्रश्न सोडवणं याला सरकारच्या धोरणात सर्वोच्च प्राधान्य असल्याचं त्यांनी सांगितलं.

शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी आर्थिक गुन्हे विभाग, ईओडब्ल्यू आणि ग्राहक न्यायालयाच्या धर्तीवर शेतकरी न्यायालय उभारण्याबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत दिली. राज्यात सोयाबीन खरेदीसाठी 2 केंद्रं निश्चित केली असून तिथं सुमारे पाच हजार पाचशे कोटी रुपयांची खरेदी झाल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यातले वीज पडून होणारे मृत्यू टाळण्यासाठी कमी परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना देणारं नवीन ॲप विकसित करण्यात येईल, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी दिली. सध्या दामिनी आणि सचेत या ॲपद्वारे 40 किलोमीटर परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना दिली जाते.

दरम्यान, राज्यात वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी किंवा शेतमजुरांच्या कुटुंबियांना दिली जाणारी मदत वाढवून ती दहा लाख रुपये करण्याची मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्याला उत्तर देताना याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचं आश्वासन महाजन यांनी दिलं. गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण आणि नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याबाबतची विधेयकं सभागृहात मंजूर करण्यात आली.

**शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर येत आहेत. एनडीए परिसरात श्रीमंत बाजीराव पेशवा प्रथम यांच्या अश्वारुढ पुतळ्याचं अनावरण यासह उद्या त्यांचे विविध कार्यक्रम नियोजित आहेत.

**हवामान केंद्र**

गावपातळीवर हवामानाची अचूक माहिती मिळावी यासाठी केंद्र सरकारनं हवामान माहिती संकलन आणि विश्लेषण प्रणाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. त्याविषयी अधिक माहिती...

**महसूल मंडळ स्तरावर स्थापन केलेल्या हवामान केंद्रांमधून मिळणारी माहिती संपूर्ण परिसरासाठी अचूक नसते. प्रत्यक्षात प्रत्येक गावातली हवामानाची स्थिती वेगळी असते. पाऊस, गारपीट, वारा यांचं प्रमाण वेगळं असतं. त्यामुळे ग्रामपंचायत पातळीवर हवामान केंद्रं उभारल्यास सध्याचं तसंच किमान/कमाल तापमान, पावसाचं प्रमाण, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्यांचा वेग आणि दिशा तसंच वायुभार ही माहिती वेळोवेळी घेतली जाईल. या नोंदी ठेवण्यासाठी प्रत्येक केंद्रात ग्रामसेवक किंवा स्थानिक अधिकारी नियुक्त असेल. ही माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर अपलोड केल्यामुळे त्याचा उपयोग शेतकऱ्यांना अचूक कृषी सल्ला, विमा दाव्यांचे आधार निश्चित करणं, आपत्तीपूर्व सूचना आणि हवामान संशोधनासाठी करता येईल. खासगी संस्थांच्या भागीदारीतून प्रत्येकी 2 किंवा 3 महसूल विभागात ही केंद्रं उभारण्यासाठी पाच कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. या निर्णयामुळे हवामान केंद्रांची अचूकता आणि उपयुक्तता**

**वाढून शेतकऱ्यांचं पिकांचं नियोजन सुधारेल, शासनाचं धोरण ठोस बनेल आणि हवामान विज्ञानाला नवे पंख मिळतील. आकाशवाणी बातम्यांसाठी, पूजा दीक्षित पुणे**

**अजित पवार**

पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेली विकासाची कामं पुढच्या शंभर वर्षांचा विचार करुन आखावीत आणि नियोजित वेळेत पूर्ण करावीत असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल एका आढावा बैठकीत दिले. सर्व कामं दर्जेदार असतील याची काळजी घ्यावी. केंद्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आयोगाचा निधी वेळेत उपलब्ध होईल आणि वर्तमान आर्थिक वर्षअखेर खर्च होईल, यादृष्टीनं काम करण्याच्या सूचना पवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**उत्तराखंड पर्यटक**

उत्तरकाशी इथं गेलेले राज्यातले सर्व पर्यटक सुरक्षित असल्याचं प्रशासनानं कळवलं आहे. हे सगळे पर्यटक जानकीचट्टी इतं असून त्यांच्या राहण्याची, जेवणाची आणि वैद्यकीय मदतीची व्यवस्था उत्तराखंड सरकारनं केली आहे. दरम्यान, या पर्यटकांशी आणि उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांसोबतही काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरुन संवाद साधला आणि काही अडचण आल्यास त्वरित संपर्क साधा असं सांगितलं. राज्यातले दीडशे पर्यटक उत्तराखंडमध्ये अडकले आहेत.

**जाजू**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला म्हणजेच एफटीआयआय संस्थेला भेट दिली. त्यांनी संस्थेतील सर्व विभागांमध्ये जाऊन कामकाज तसंच प्रशिक्षणाची माहिती घेतली. उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांसोबत त्यांनी संवादही साधला. त्यांनी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या परिसराला देखील भेट दिली. यावेळी मंत्रालयाच्या पुण्यातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**क्रिकेट**

बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन इथं दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारतानं इंग्लंडविरुद्ध पाच बाद 310 धावा केल्या. कर्णधार शुभमन गिल 114 धावांसह आणि रवींद्र जडेजा 41 धावांसह खेळत आहेत. जसप्रीत बुमराहला विश्रांती देऊन वेगवान गोलंदाज आकाश दीप पदार्पण करत आहे. शार्दुल ठाकूर आणि साई सुदर्शन यांच्या जागी वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी यांचाही समावेश केला आहे.

**पाऊस-रत्नागिरी**

रत्नागिरीत गेले काही दिवस चांगला पाऊस होत आहे. काल संध्याकाळनंतर पावसाचा जोर वाढला असून, मुसळधार पावसाची संततधार सुरू आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पुण्याच्या घाटमाथ्यासाठी लाल बावटा तर ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे तसंच नाशिक, सातारा आणि कोल्हापूरचा घाटमाथा या भागांना नारंगी बावटा फडकवण्यात आला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.